**Maharashtra University of Health Sciences, Nashik**
**Physiotherapy Faculty**
**Trust Deed / Bylaws / Registration Certificate**
**Registration Certificate (Trust / Hospital (Bombay Nursing Act))**

**Faculty :- BPTH**
**Name of College/Institute:- Smt. Vimladevi College of Physiotherapy, Wandhari, Chandrapur**

| | | |
|---|---|---|
| Name of Trust / Society | | **Shri. Gurukrupa Shikshan Prasarak Mandal, Chandrapur (M.S.)** |
| Registration Certificate | | Trust / Society :- **Reg.No.165/94, F-11568**<br><br>Hospital (Bombay Nursing Act) :- **Available** |
| Name of the College / Institute<br>(As per First Affiliation letter) | : | **Smt. Vimladevi College of Physiotherapy, At. Village Wandhari, Ghugus Road, Chandrapur-442406** |
| Address | : | **At- Ghugus Road, Wandhari, Chandrapur – 442406**<br>**Postal Address – New Post Box. No. 33, Main GPO, New Water, Tank, Chandrapur (M.S.)**<br>**Pin Code- 442401** |
| Email ID | : | **vimladeviphysio@gmail.com** |
| Telephone / Mobile No.(s) | : | **9322396873, 8010914860** |
| Website | : | **www.vimladeviphysio.com** |
| College Code | : | **165116** |

Smt. Vimladevi College of Physiotherapy Dist. Chandrapur

Principal
Smt. Vimladevi College of Physiotherapy,
Wandhari, Chandrapur

**Dean/ Principal Stamp & Signature**

**Verified by The LIC Committee Members**

_______________ _______________ _______________ _______________

विशेष/ध.आ./मु.सा.वि./२अ.

11

सत्यमेव जयते

## नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम; १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये नागपुर विभाग नागपुर ........ येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव श्री गुरुकृपा शिक्षण प्रसारक मंडळ, नागपुर ........

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक एफ- ११५६८ (ना.) ........ डा. सुनील मनोहर देव ........ यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक १३/२/ १९९५ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

सही ........

पदनाम सहाय्यक धर्मादाय आयुक्त
नागपूर विभाग, नागपूर.

Principal
Smt. Vimladevi College of Physiotherapy,
Wandhari, Chandrapur

The copy was applied for on 10-3-98
The copy was ready for delivery on 11-3-98
The copy was delivered & the endorsement was made on 11-3-98

Words ......
Copying Charges ......
Comparing Charges ......
Stamp & Postal Charges ......

Total Rs 2-00

PDPande 11-3-98
Superintendent
Office of the Jt. Charity Commissioner
Maharashtra State. Nagpur

# नोंदणी प्रमाणपत्र

## संस्था नोंदणी अधिनियम, १८६०

नोंदणी क्रमांक महा/१६५/९४
नागपुर.

कार्यालयाचे नाव :- संस्थाचे सहाय्यक निबंधक ......
...... नागपुर ......
...... विभाग

संस्थेचे नांव व पत्ता :- श्री गुरुकृपा शिक्षण प्रसारक
...... मंडळ, नागपुर ......

कोणास देण्यात आले ते :- श्री. डॉ. सुनील मनोहर देव
...... (अध्यक्ष) ......

तारीख :- ४ मार्च १९९४

sd/-
संस्थांचे सहाय्यक निबंधक,
...... नागपुर विभाग.
sd/- ...... 
[शिक्का]
स्थळ प्रतीची सत्य प्रत.

JOINT CHARITY COMMISSIONER
M. S. NAGPUR

CERTIFIED TO BE TRUE COPY

PDPande 11-3-98
Superintendent
Office of the Jt. Charity Commissioner
Maharashtra State. Nagpur

typed by ......
Read by ......
Compared by ......

श्रीकृष्णा विमल प्रसाद मंडळ नागपूर

सार्वजनिक न्यास प्रशासन निधी/PUBLIC TRUSTS ADMINISTRATION FUND

F- 11567

अहस्तांतरणीय/Not Transferable

मूळ प्रत/*Original Copy*

धर्मादाय संघटना, महाराष्ट्र राज्य यांस केलेल्या प्रदानाची पावती

**Receipt for Payment to the Charity Organisation, Maharashtra State**

ठिकाण/Place चंद्रपूर दिनांक/Date 21/9/2024 Received from

अनिल कुमार [illegible] यांजकडून रु./Rs. 150/-

(रुपये/Rupees एकशे पन्नास फक्त)

on account of नो. क्र. 1082/19 [illegible]

[illegible] यांकरिता मिळाले.

[illegible] 21/9/2024

लेखापाल/Accountant.

Smt. Vimladevi College of Physiotherapy Dist. Chandrapur

Principal

Smt. Vimladevi College of Physiotherapy,

Wandhari, Chandrapur

क्रमांक 2800/06 कलम 19 अन्वय
अर्जदाराचे नाव इंद्रजीत सिंह
अर्ज आला तो दिनांक 30/10/06
... दिनांक 30/10/06
... तो दिनांक 30/10/06
... रुपये 20/- दिनांक 30/10/06 ... मीळाली.

"श्री गुरुकृपा ~~वैद्यकीय~~ शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर" या संस्थेचे

ज्ञा प न

Exh. No. 6

मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशन

A/C. C.

१. संस्थेचे नांव :- या संस्थेचे नांव श्री गुरुकृपा ~~वैद्यकीय~~ शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर" असे राहील.

२. कार्यालयाचा पत्ता :- या संस्थेचे कार्यालय श्री रामकृष्ण मनोहर देव घर नं. ~~६७२~~, २०९, लक्ष्मीनगर, नागपूर येथे राहील.

३. संस्थेचे उद्देश :- ही संस्था शैक्षणीक ~~व वैद्यकीय~~ धर्मदाय क्षेत्रात कार्य करील.

१] शिक्षणाचे प्रसारार्थ बालक मंदिर, कॉन्व्हेंट, प्राथमीक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, शाळा, महाविद्यालय व तांत्रीक महाविद्यालय स्थापन करुन ते चालविणे.

२] कला, वाणीज्य, विज्ञान, अंधविद्यालय, मुक व बधीर विद्यालय स्थापन करुन चालविणे.

३] शिवणकला, विणकाम, भरतकाम, चित्रकला, नृत्य, गायन, वादन, वैद्यकीय शिक्षण देणे.

४] सार्वजनिक वाचनालय व वस्तीगृह स्थापन करुन ते चालविणे.

५] विद्यार्थ्यांना पुस्तके व स्कॉलरशिप देऊन मदत करणे.

६] गरिबांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देणे.

४. "श्री गुरुकृपा वैद्यकीय शिक्षण प्रसारक मंडळ नागपूर" या संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थेच्या व्यवस्था व कारभार सोपविण्यात आलेला आहे अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची नांवे, पत्ते, हुद्दे, वय, राष्ट्रीयत्त्व व व्यवसाय खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | पूर्ण नांव | पत्ता | हुद्दा | वय | राष्ट्रीयत्त्व | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | डॉ. सुनिल मनोहर देव | २०९ लक्ष्मीनगर, नागपूर | अध्यक्ष | ३५ | भारतीय | डॉक्टर |
| २. | श्री मणासाराम मंगलसिंग कुमरे | सुभाषनगर, नागपूर | उपाध्यक्ष | ४९ | " | नौकरी |
| ३. | डॉ. अनिल मनोहर देव | २०९, लक्ष्मीनगर नागपूर | सचिव | ३५ | " | डॉक्टर |
| ४. | डॉ. वीणा विश्वनाथ कावळे | गोपालनगर, नागपूर | सहसचिव | ३० | " | " |
| ५. | डॉ. मणीषा पद्माकर डोंगरे | जयप्रकाशनगर, नागपूर | कोषाध्यक्ष | २७ | " | " |
| ६. | श्री मिलींद पद्माकर डोंगरे | जयप्रकाशनगर, नागपूर | सभासद | २५ | " | नौकरी |
| ७. | श्री योगेंद्र विश्वनाथ कावळे | गोपालनगर, नागपूर | " | २८ | " | " |

... २

Superintendent
Trusts Registration Office
Nagpur Region, Nagpur.

५. आम्ही खाली सह्या करणारे "श्री गुरुकृपा ~~वैद्यकीय~~ शिक्षण व प्रसार मंडळ" नागपूर, या संस्थेचे सभासद जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तीत्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येऊन "श्री गुरुकृपा वैद्यकीय शिक्षण प्रसार मंडळ" नागपूर, ही संस्था आज दि. १७ डिसेंबर ९३ रोजी स्थापन केली असून ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

| अ.क्र. | पूर्ण नांव | पत्ता | सह्या |
|---|---|---|---|
| १. | डॉ. सुनिल मनोहर देव | २०९, लक्ष्मीनगर, नागपूर | |
| २. | श्री मणासाराम मंगलसिंग कुमरे | सुभाषनगर, नागपूर | |
| ३. | श्री. अनिल मनोहर देव | २०९, लक्ष्मीनगर, नागपूर | |
| ४. | डॉ. मनिषा पद्माकर डोंगरे | जयप्रकाशनगर, नागपूर | |
| ५. | डॉ. वीणा विश्वनाथ कावळे | गोपालनगर, नागपूर | |
| ६. | श्री मिलींद पद्माकर डोंगरे | जयप्रकाशनगर, नागपूर | |
| ७. | श्री योगेन्द्र विश्वनाथ कावळे | गोपालनगर, नागपूर | |

स्थळ : नागपूर

दिनांक : १७.१२.९३

वरील सह्या करणाऱ्या सभासदांना मी ओळखतो व त्यांनी माझ्या समक्ष या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

दिनांक : १७ डिसेंबर १९९३

सही

विशेष कार्यकारी दंडाधिकारी,

व्ही. आर. राजवैद्य
विशेष कार्यकारी दंडाधिकारी
धरमपेठ, झेंडा चौक, नागपूर - १०

Certified To Be
Xerox True Copy

Superintendent
Public Trusts Registration Office
Nagpur Region

XEROX By 30/10/06

क्र. 2800/06 कलम 19 अन्वये
नाव इंद्रजीत सिंह
अर्ज आला तो दिनांक 30/10/06
... दिनांक 30/10/06
... तो दिनांक 30/10/06

परिशिष्ट "क"

"श्री गुरूकृपा वैद्यकीय शिक्षण प्रसार मंडळ" नागपूर या संस्थेची

नियम व नियमावली

रुपये 20/- दिनांक 30/10/06 रोजी मिळाली.

Exh. No. 7

१. नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या :

१] संस्था :- संस्था म्हणजे "श्री गुरूकृपा वैद्यकीय शिक्षण प्रसार मंडळ" नागपूर, असे समजले जाईल.

२] अध्यक्ष :- अध्यक्ष म्हणजे "श्री गुरूकृपा वैद्यकीय शिक्षण प्रसार मंडळ" नागपूर, या संस्थेचे अध्यक्ष असे समजले जाईल.

३] उपाध्यक्ष :- उपाध्यक्ष म्हणजे "श्री गुरूकृपा वैद्यकीय शिक्षण प्रसार मंडळ" नागपूर, या संस्थेचे उपाध्यक्ष असे समजले जाईल.

४] सचिव :- सचिव म्हणजे "श्री गुरूकृपा वैद्यकीय शिक्षण प्रसार मंडळ" नागपूर या संस्थेचे सचिव असे समजले जाईल.

५] सहसचिव :- सहसचिव म्हणजे "श्री गुरूकृपा वैद्यकीय शिक्षण प्रसार मंडळ" नागपूर, या संस्थेचे सहसचिव असे समजले जाईल.

६] कोषाध्यक्ष :- कोषाध्यक्ष म्हणजे "श्री गुरूकृपा वैद्यकीय शिक्षण प्रसार मंडळ" नागपूर, या संस्थेचे कोषाध्यक्ष असे समजले जाईल.

७] कार्यकारी मंडळाचे सभासद :- कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणजे "श्री गुरूकृपा वैद्यकीय शिक्षण प्रसार मंडळ नागपूर, या संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सभासद असे समजले जाईल.

८] इतर सभासद :- इतर सभासद म्हणजे "श्री गुरूकृपा वैद्यकीय शिक्षण प्रसार मंडळ, नागपूर" या संस्थेचे सर्वसाधारण सभेचे सभासद असे समजले जाईल.

९] कार्यालयाचा पत्ता :- या संस्थेचे कार्यालय श्री रामकृष्ण मनोहर देव, घर नं. ५८२, २०१ लक्ष्मीनगर, नागपूर येथे राहील.

२. कार्यक्षेत्र :- या संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण भारतात. राहील.

३. हिशोबाचे वर्ष :- या संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रील ते ३१ मार्च असे राहील.

४. सभासदत्व व त्यांची नोंदणी पध्दत :- वयाचे २१ वर्षावरील कोणत्याही भारतीय व्यक्तीला या संस्थेचे सभासद होता येईल, त्याकरीता त्यांना संस्थेकडे रितशीर अर्ज करावा लागेल, आलेल्या अर्जाला कार्यकारी मंडळाने मंजुरी दिल्यावर सभासदत्वाचि निर्धारित वर्गणी संस्थेत जमा केल्यानंतर त्यांची नोंदणी संस्थेच्या सभासद यादीमध्ये करण्यात येईल.

Superintendent
Public Trusts Registration Office
Nagpur Region, Nagpur.

... २

पा. देण
क्र. ३

५. <u>सभासदाचे प्रकार</u> :- या संस्थेत एकाच प्रकारचे सभासद राहतील.

अ] <u>साधारण सभासद</u> :- संस्थेला रुपये १०१/- दरवर्षी सभासद वर्गणी देणा-या आणि संस्थेच्या नियमाचे पालन करणा-या व्यक्तीला संस्थेचा साधारण सभासद होता येईल.

६. <u>सभासदत्व रद्द होणे</u> :- कोणताही सभासद कायदेशीर गुन्हेगार ठरला असेल, सभासद वर्गणी दिली नसेल, मरण पावला असेल, गैर वर्तणुक करीत आहे असे निदर्शनाला आल्यास, संस्थेला नुकसान पोहचवित आहे, किंवा अन्य कारणावरुन कार्यकारी मंडळाने बहुमताने ठराव मंजुर करुन काढुन टाकल्यास सभासदत्व रद्द झाले असे समजले जाईल.

७. <u>सर्वसाधारण सभा तीचे अधिकार आणि कार्य</u> :- सर्वसाधारण सभा ही संस्थेची सर्वश्रेष्ठ व शेवटचा निर्णय देणारी सभा म्हणुन समजली जाईल, ही सभा वर्षातुन एकवेळातरी घेतली पाहीजे, या सभेत सर्व प्रकारचे सभासद भाग घेऊ शकतील, कार्यकारी मंडळाने चालविलेल्या कार्यावर नियंत्रण ठेवणे, वार्षीक हिशोब मंजुर करणे, पुढील नवीन वर्षाचे अंदाजपत्रकाल मंजुरी देणे, आवश्यकतेनुसार नियमात बदल करणे, दर पाच वर्षांनी कार्यकारी मंडळाच्या पदाधिका-यांची निवड करणे, वेळेवर येणा-या ठरावावर निर्णय घेणे.

८. <u>सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या</u> :- सर्वसाधारण सभेची सुचना संस्थेच्या सर्व सभासदांना देणे आवश्यक राहील, सुचनेमध्ये, दिनांक, वेळ, स्थळ व सभेचे विषय नमुद केलेले असावे, सुचना सर्व सभासदांना संस्थेच्या डाकबुकावर सही घेऊन देता येईल, अगर टपालाद्वारे पाठविता येईल, सुचना सभेच्या आठ दिवस अगोदर पाठविणे आवश्यक राहील.

एकुण सभासद संख्येच्या ३/५ सभासद उपस्थीत झाल्यास सभेची गणसंखे अभावी सभा स्थगीत झाल्यास स्थगीत सभेला कोरमचे बंधन राहणार नाही परंतु तशी सुचना, सुचना पत्रात असणे आवश्यक राहील.

९. <u>विशेष सर्वसाधारण सभा व तीची कार्ये</u> :- अशी सभा आवश्यकतेनुसार केव्हाही घेता येईल, जीकार्ये सर्वसाधारण सभा करुशकेल ती सर्व कार्य करण्याचा अधिकार विशेष सर्वसाधारण सभेला राहील.

१०. <u>संस्थेचे कार्यकारी मंडळ पदाधिकारी यांची रचना</u> :- संस्थेच्या कार्यकारी मंडळात एकुण सात सभासद राहतील , त्यात पुढील - प्रमाणे पदाधिका-यांचा समावेश राहील. अध्यक्ष एक, उपाध्यक्ष एक,

... ३

सचिव एक, सहसचिव एक, कोषाध्यक्ष एक, अन्य दोन कार्यकारी मंडळाचे सभासद राहतील.

११. कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ व निवडणूकीची पध्दत :- कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ पाच वर्षांचा राहील, निवडणूक गुप्तमतदान पध्दतीने सर्वसाधारण सभेत बहुमताने करण्यात येईल.

१२. कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे :-

१] अध्यक्ष :- सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारून कामकाज चालविणे व संस्थेच्या हितसबंधाने योग्य ते आदेश देणे, संस्थेच्या कारभारावर व इतर शाखेवर नियंत्रण ठेवणे, आवश्यकता भासल्यास सभा आयोजित करणे, रकमेची देवाण घेवाण करणे.

२] उपाध्यक्ष :- अध्यक्षाचे गैर हजेरित अध्यक्षाचे कार्य करणे व इतर वेळी त्यांना संस्थेच्या कामात आवश्यक ती मदत करणे.

३] सचिव :- सभेची सूचना काढुन सभा आयोजित करणे, संस्थेचा पत्रव्यवहार करणे, संस्थेच्या कार्यावर व इतर शाखेवर नियंत्रण ठेवणे, संस्थेची सर्व कोर्टकचेरीची कामे करणे, वार्षीक हिशोबाचे पत्रक तयार करून सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे, त्यांच्या अडचणी पाहुन त्यांना आवश्यक ती मदत करणे, संस्थेच्या मालमत्तेवर लक्ष ठेवणे, मंजुर झालेले ठराव अमलात आणणे, रकमेची देवान घेवान करणे, संस्थेच्या दृष्टीने हितावह असलेले इतर कोणतेही काम करणे.

४] सहसचिव :- सचिवाचे गैर हजेरीत सचिवाचे काम करणे अन्यथा त्यांना संस्थेच्या कामात आवश्यक ती मदत करणे.

५] कोषाध्यक्ष :- संस्थेच्या सर्व आर्थीक परिस्थीतीवर लक्ष ठेवणे, देवाण घेवाण करणे, हिशोब लिहीने अगर लिहुन घेणे. ऑडीटर यांनी काढलेल्या त्रुटींची पुर्तता करणे, संस्थेच्या सर्व कार्यावर लक्ष ठेवणे, संस्थेच्या हितार्थ योग्य ते कार्य करणे.

६] कार्यकारी मंडळाचे सभासद :- कार्यकारी मंडळाच्या सभेत व सर्वसाधारण सभेत उपस्थीत राहणे, निवडणूकीचेवेळी मतदान करणे, संस्थेच्या कामात आवश्यक ती मदत करणे.

७] इतर सभासद :- सर्वसाधारण सभेला उपस्थीत राहणे, निवडणूकीचेवेळी मतदान करणे व संस्थेच्या कामात आवश्यक ती मदत करणे.

१३. कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा :- कार्यकारी मंडळाच्या वर्षातून कमीत कमी तीन सभा घेणे आवश्यक राहील, संस्थेच्या ३/५ सभासदांनी मागणीकेल्यास क अध्यक्षांनी किंवा सचिवांनी कार्यकारी मंडळाची सभा मागणी केल्यापासून १५ दिवसाचे आंत

... ४

सभा बोलाविण्याचे बंधन राहील, अशी सभा बोलावतांना सूचनेत मागणीचे विषय नमुद करणे आवश्यक राहील, मागणीच्या सभेला कार्यकारी मंडळाचे सर्व अधिकार राहतील.

१४. कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्या :- कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना तीन दिवस अगोदर देणे आवश्यक राहील, सूचनेमध्ये दिनांक, वेळ, स्थळ व सभेचे विषय नमुद करणे आवश्यक राहील, सूचना संस्थेच्या डाकबुकात सही घेऊन अथवा टपालाद्वारे पाठविता येईल,

कार्यकारी मंडळाच्या एकुण संख्येच्या ३/५ पदाधिकारी सभेत उपस्थीत झाल्यास गणसंख्या पूर्ण झाली असे समजल्या जाईल. तहकुब सभेला कोरमचे बंधन राहणार नाही परंतु तशी सूचना सूचना पत्रात असणे आवश्यक राहील.

१५. कार्यकारी मंडळाचे निवडणूकीचे नियम :- कार्यकारी मंडळाचे निवडणूकीचे नियम सर्वसाधारण सभा ठरविल त्याप्रमाणे राहील, ज्यासभासदाकडे संस्थेची कोणतीही रक्कम येणे बाकी आहे अशा सभासदाला निवडणूकीत उमेदवार म्हणुन उभे राहता येणार नाही व मतदान करण्याचासुध्दा हक्क राहणार नाही.

१६. कार्यकारी मंडळातील रिक्तपद भरण्याबाबत :- सभासदाने राजीनामा दिल्यास, मृत्यु पावल्यास किंवा अन्य कोणत्याही कारनास्तव कार्यकारी मंडळातील एखादे पद रिक्त झाल्यास उरलेल्या कार्यकारी मंडळाचे बहुमताने रिक्तपद भरण्यात येईल.

१७. कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये :- कार्यकारी मंडळ संस्थेच्या सर्व कार्यावर नियंत्रण ठेवील, सर्वसाधारण सभेने मंजुर केलेल्या ठरावांची पूर्तता करील संस्थेचे कार्य सुचारू रूपाने चालावे म्हणुन किरकोळ नियम तयार करील, आवश्यक तेनुसार नियमात बदल करता येईल, तसेच एखाद्या कार्याकरीता उपसमिती नियुक्त करता येईल, त्याचेकडुन हिशोब तसेच वेळो-वेळी माहीती घेऊ शकेल व कार्य समाप्तीनंतर उपसमिती बरखास्त बदद करता येईल, संस्थेच्या शाखा कार्यालयांना मान्यता देणे, संस्थेवर असलेल्या सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करणे, हिशोबा वर नियंत्रण ठेवणे, तक्रारीची दखल घेणे, कार्यकारी मंडळाचे रिक्तस्थान भरणे, सेवकांची नियुक्ती करणे, बहुमताने मंजुर झालेल्या ठरावांना कायदेशीर ठरवुन अमलात आनता येईल.

१८. संस्थेचा निधी मिळकत व विनीयोग :- सभासद फी, वर्गणी, देणगी, अनुदान, संस्थेचे व उत्पन्नाचे साधन राहील, संस्थेच्या उद्देश पूर्तीकरीता निधी गोळा करता येईल व ती स्थावर स्वरूपाच्या मिळकतीसाठी गुंतविता येईल, अशा मिळकतीची -

... ५

नोंद पब्लीक ट्रस्ट रजीष्टरमध्ये बदल अर्ज देऊन करावी लागेल.

१९. उद्दीष्ट निहाय खर्चाची तरतुद :- [टक्केवारी प्रमाणे] शैक्षणीक कार्यावर ६० टक्के, धर्मादायी व धार्मीक कार्यावर ४० टक्के खर्च करण्यात येईल.

२०. कर्ज किंवा ठेवी संबंधी तरतुद :- संस्थेला आवश्यकता भासल्यास कोणत्याही व्यक्तीकडुन किंवा बँकेकडुन कर्ज किंवा ठेवी स्वीकारता येईल, त्याकरीता मे धर्मादाय सह आयुक्त नागपूर यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

२१. स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करणेबाबतची तरतुद :- संस्थेकरिता स्थावर मालमत्ता खरेदी करणे तसेच ती विक्री करण्याचा अधिकार संस्थेला राहील. त्याकरीता कार्यकारी मंडळाची बहुमताने संम्मती घ्यावी लागेल, संस्थेची स्थावर मालमत्ता विक्री करावयाची असल्यास ती विकण्यापूर्वी मे. धर्मादाय सह आयुक्त नागपूर यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

२२. बँक खाते :- संस्थेजवळ असलेली वित्तल्क रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत संस्थेच्या नावाने ठेवता येईल अध्यक्ष, ~~व~~ कोषाध्यक्ष, व सचिव (किंवा) या दोन पदाधिका-यांचे संयुक्त सहीने रक्कम काढता येईल.

२३. सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत :- १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १५ अनुसार संस्थेचे जे सभासद असतील त्यांची एक यादी १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमातील नियम १५ प्रमाणे अनुसूची ६ चे नमुन्यात ठेवण्यात येईल.

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम ४ प्रमाणे व १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम व नियम ७ प्रमाणे दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी अनुसूची एक च्या नमुन्यात आपले विभागाचे सहाय्यक संस्था निबंधकाचे कार्यालयात पाठवावी लागेल.

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम ४/अ प्रमाणे व नियम ८ प्रमाणे दरवर्षी संस्थेत नौकरीस लावलेल्या व्यक्तींच्या नौकरीसबंधी अटीबाबतचे विवरण अनुसूची २ च्या नमुन्यात आपले विभागाचे सहाय्यक संस्था निबंधकाचे कार्यालयात पाठवावे लागेल.

२४. नियम आणि नियमावलीतील बदल करण्याची तरतुद :- संस्थेच्या नियम आणि नियमावलीतील बदल करावयाचा असल्यास सर्वसाधारण सभेत उपस्थीत सभासदांच्या ३/५ बहुमताने ठराव मंजुर करुन नियमावलीतील बदल करता येईल, १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमाचे कलम १२ प्रमाणे कार्यवाही पूर्ण करावी लागेल.

२५. <u>संस्थेच्या नावात व उद्देशात बदल करण्याबाबतची तरतुद</u> :- संस्थेच्या नावात अथवा उद्देशात बदल करावयाचा झाल्यास अन्यथा दोन संस्थेचे विलीनीकरण करावयाचे असल्यास १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १२ अथवा १२/अ प्रमाणे कार्यवाही पूर्ण करावी लागेल.

२६. <u>विसर्जन</u> :- संस्थेचे कार्य बंद करावयाचे असल्यास ३/५ सभासदाचे बहुमताने सर्वसाधारण सभेत मंजुरी घ्यावी लागेल, संस्थेचे सर्व-प्रकारचे देणे-घेणे बाबतचे व्यवहार पूर्ण करावे लागतील, तसेच संस्थेची शिल्लक मालमत्ता अन्य दुसऱ्या संस्थेला दान म्हणुन देता येईल १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १३ व १४ प्रमाणे संस्था विसर्जनाची कार्यवाही पूर्ण करावी लागेल.

"दा ख ला"

प्रमाणीत करण्यात येते की, "श्री गुरुकृपा ~~[illegible]~~ शिक्षण प्रसार मंडळ" नागपूर, या संस्थेच्या नियम व नियमावलीची सत्यप्रत आहे.

| अ.क्र. | पूर्ण नांव | हुद्दा | सह्या |
|---|---|---|---|
| १. | डॉ. सुनिल मनोहर देव | अध्यक्ष | |
| २. | श्री मणासाराम मंगलसिंग कुमरे | उपाध्यक्ष | |
| ३. | डॉ. अनिल मनोहर देव | सचिव | |

स्थळ : नागपूर

दिनांक : १७ डिसेंबर ९३.

JOINT CHARITY COMMISSIONER M.S. NAGPUR

XEROX By 30/10/06

Certified To Be Xerox True Copy
30/10/06
Superintendent
Public Trusts Registration Office
Nagpur Region, Nagpur.